Literacy for a Billion

Movie: Rangi Berangi
Year:

Song: Sadhu Sant Ani Pothi
Lyricist:

गोविंद हरी गोविंद हरी
गोविंद हरी गोपाळ
साधुसंत अन पोथी पुराणे
एक तत्व सांगती
देवाहूनही महान
आईबापाची महती
आईबापाची महती
गोविंद हरी गोविंद हरी
गोविंद हरी गोपाळ
पांडुरंग हरी वासुदेव हरी
पांडुरंग हरी वासुदेव
आईबापाची करीत सेवा
पुंडलिक बसला
त्याच्या भेटीसाठी
देव पांडुरंग आला
आईबापाची करीत सेवा
पुंडलिक बसला
त्याच्या भेटीसाठी
देव पांडुरंग आला
पुंडलिक परी जागे वरूनी
मुळी नाही उठला
पाडुरंग त्या पुंडलिकाची
वाट बघत थांबला
अशाच भक्ताच्या दारावर
देव नित्य तिष्ठती

गोविंद हरी गोविंद हरी
गोविंद हरी गोपाळ
साधुसंत अनपोथी पुराणे
एकतत्व सांगती...
कावड घेऊन खांदयावरती
श्रावणबाळ निघाला
तीर्थांची पुण्याई देई
आईबापाला
कावड घेऊन खांदयावरती
श्रावणबाळ निघाला
तीर्थांची पुण्याई देई
आईबापाला
लोभाने माता कैकयी
भले दुष्ट होई
आज्ञा पालन करण्या
राम वनवासा जाई
मान जन्मदात्यांचा राखी
अशी थोर संतती
साधुसंत अन पोथी पुराणे
एक तत्व सांगती...
देवाहूनही महान
आईबापाची महती
आईबापाची महती
गोविंद हरी गोविंद हरी
गोविंद हरी गोपाळ

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*